महाराष्ट्र शासन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला

फोन नं. ०७२४.२४३७०७८ ई मेल :acadgmca@hotmail.com

जा.क्र.शावैमगों/क.त/प्राध्या/सह.प्रा./जाहिरात/ 7199 /२०२३ दि. 3 / ११/२०२३

# जाहिरात

विषय :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला तसेच अतिविशेषोपचार रुग्णालय येथील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांची पदे करार तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसाकरिता भरण्याबाबत.

संदर्भ :-१. आयुक्त,वै.शि.व सं,मुंबई यांचे पत्र क्रं.संवैशिवसंमु/जाहिरात/करार/क१/२५९३/२०२३,दि.२५.०८.२३

संदर्भीय क्रं. १ व २ च्या अनुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, व अतिविशेषोपचार रुग्णालय अकोला येथील विद्यार्थी व रुग्णहीत लक्षात घेता रिक्त असलेले प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांचे करारा तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसाकरिता अटी व शर्तीच्या अधीन राहून पदे भरण्याबाबतची जाहिरात देण्यात येत असून सदर जाहिरातीचे विवरण खालील प्रमाणे आहे.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला

### प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांची रिक्त पदे दर्शविणारा तक्ता (करार तत्वावर)

**पदाचे नावः- प्राध्यापक (चिकीत्सालयीन विभाग)**

| अ. क्र. | विषयाचे नाव | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | औषधवैद्यकशास्त्र | ०१ | M.D.(General Medicine)/DNB (General Medicine) | As per notification14-02-2022<br>I) Associate Professor in the subject for 3 years in a permitted/Approved/ recognized medical colleg/institution.<br>II) Should have atleast four Research Publications (atleast two as Associate Professor) (only original papers,meta-analisis, systematic reviews and case series that are published in journals indexed in Medline, Pubmed Central, Citation index, Sciences Citation index, Expanded Embase, Scopus, Directory of Open Excess journals (DOAJ) will be considered). The athour must be amongst first three or should be the corresponding author.<br>iii) Should have completed the basic course in biomedical research from institution (s) designated by NMC. |
| २ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | ०१ | M.S(Orthopedics) DNB (Orthopedics) | |
| ३ | क्ष-किरणशास्त्र | ०१ | M.D. (Radio-Diagnosis)/ M.D.(Radiology) /DNB (Radio-Diagnosis)/ (Radiology) | |
| | एकूण | ०३ | | |



www.A1Noukri.com

Scanned with OKEN Scanner

पदाचे नावः- सहयोगी प्राध्यापक (चिकीत्सालयीन विभाग)

| अ. क्र. | विषयाचे नाव | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | औषधवैद्यकशास्त्र | ०१ | M.D (General Medicine)/DNB (General Medicine) | As per notification14-02-2022<br><br>I) Associate Professor in the subject for 4 years in a permitted/Approved/ recognized medical college/institutiona.<br><br>II) Should have atleast four Research Publications (atleast two as Associate Professor) (only original papers,meta-analisis, systematic reviews and case series that are published in journals indexed in Medline, Pubmed Central, Citation index, Sciences Citation index, Expanded Embase, Scopus, Directory of Open Excess journals. (DOAJ) will be considered), The athour must be amongst first three or should be the corresponding author.<br><br>iii) Should have completed the basic course in biomedical research from institution (s) designated by NMC. |
| २ | बालरोगचिकीत्साशास्त्र | ०२ | M.D (Paediatrics) / DNB (Paediatrics) | |
| ३ | क्ष-किरणशास्त्र | ०१ | M.D. (Radio-Diagnosis) M.D. (Rediology) / DNB (Rediology) | |
| ४ | मनोविकृतीशास्त्र | ०१ | M.D. (Psychiatry)/ M.D. (Psychological Medicine)/ M.D.(Medicine with Deploma in Psychological Medicine)/ DNB (Psychiatry) | |
| ५ | नेत्रशल्यचिकीत्साशास्त्र | ०१ | M.S.(Ophthalmology)/<br><br>DNB (Ophthalmology) | |
| ६ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | ०१ | M.D(Dermatlogy and Venereology) DNB (Dermatlogy and Venereology)<br><br>M.D(Dermatlogy and Venereology and leproosy) | |
| | एकूण | ०७ | | |

## अतिविशेषोपचार रुग्णालय अकोला

प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांची रिक्त पदे दर्शविणारा तक्ता (करार तत्वावर)

पदाचे नावः- प्राध्यापक

| अ. क्र. | विषयाचे नाव | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | हृदयरोग चिकित्साशास्त्र (कार्डिओलॉजी विभाग) | ०१ | DM/DNB (Cardiology) | As per notification14-02-2022<br><br>I) Associate Professor in the subject for 3 years in a permitted/Approved/ recognized medical colleg/institution.<br><br>II) Should have atleast four Research Publications (atleast two as Associate Professor) (only original papers, meta-analysis, systematic reviews and case series that are published in journals indexed in Medline, Pubmed Central, Citation index, Sciences Citation index, Expanded |
| २ | मज्जातंतू चिकित्साशास्त्र (न्युरॉलॉजी विभाग) | ०१ | DM/DNB (Neurology) | |

www.A1Noukri.com
Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | Embase, Scopus, Directory of Open Excess journals (DoAJ) will be considered). The athour must be amongst first three or should be the corresponding author<br><br>iii) Should have completed the basic course in biomedical research from institution (s) designated by NMC |
| ३ | जळीत व सुघटन (बर्न व प्लॅस्टिक सर्जरी विभाग) | ०१ | M ch/DNB (Plastic Surgery) | |
| | एकूण | ०३ | | |

—२—

| पदाचे नावः- सहयोगी प्राध्यापक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | विषयाचे नाव | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
| १ | नवजात अर्भक चिकित्सा (न्युओनेटोलॉजी विभाग) | ०१ | DM/DNB (Neonatology) | As per notification 14-02-2022<br><br>I) As Assistant Professor in the subject for 2 years in a permitted/Approved/ recognized medical college/institution.<br><br>II) Should have atleast Two Research Publications (only original papers, meta-analysis, systematic reviews and case series that are published in journals included in Medline, Pubmed Central, Citation index, Sciences Citation index, Expanded Embase, Scopus, Directory of Open Excess journals (DoAJ) will be considered). The athour must be amongst first three or should be the corresponding author.<br><br>iii) Should have completed the basic course in biomedical research from institution (s) designated by NMC. |
| २ | मुत्रपिंडविकार (नेफ्रोलॉजी विभाग) | ०१ | DM/DNB (Nephrology) | |
| ३ | बधिरीकरणशास्त्र (ॲनेस्थेशिया विभाग) | ०१ | M.D./DNB (Anesthesiology) | |
| | एकूण | ०३ | | |

टिप : सदर जाहिरातीमधील नमुद पदसंख्येत बदल करणे/ सदरची जाहिरात पुर्णतः रदद करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे.

१. या संस्थेच्या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे तसेच अर्ज उपलब्ध आहे.
२. अर्ज उपलब्ध :- दि. ०७/११/२०२३
३. अर्जाचेशुल्क :- रु.१००/-

www.A1Noukri.com
Scanned with OKEN Scanner

४. अर्ज सादर करण्याचा शेवटचा :- दि. १७ / ११/२०२३ (सायंकाळ ०४.०० पर्यंत )

५. मुलाखतीचा दिनांक व वेळ. - पात्र उमेदवारांना मुलाखतीचा दिनांक व वेळ प्रत्यक्ष दुरध्वनी संदेशाव्दारे कळविण्यात येईल.

६. मुलाखतीचे ठिकाण :- अधिष्ठाता यांचे कार्यालय शा.वै.म., अकोला.

७. शासकीय सुटीचे दिवस वगळून शासकीय वेळेत विहीत नमुन्यातील अर्ज या कार्यालयात सादर करावे. मुलाखतीच्या वेळेस मुळ कागदपत्रे सादर करावे.

८. मुलाखती करिता उपस्थित राहण्याकरिता कोणत्याही प्रकारचे दैनिक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

९. उमेदवाराने कुठल्याही प्रकारे शिफारस पत्र जोडू नये किंवा इतर माध्यमातून शिफारस केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

**महत्वाची टिप :**

१) उमेदवार हा भारताचा नागरीक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.

२) उमेदवाराचे वय : नियुक्तीच्या वेळेस कमाल ६९ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३) प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना करार पध्दतीने नियुक्तीसाठी त्या त्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांबरोबरच कोणत्याही वयोगटाचे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विहीत केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) पात्र असतील.

४) मानधन :

| पदनाम | नियुक्तीची संस्था | मानधन |
|---|---|---|
| प्राध्यापक | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला | रु.२,००,०००/- (दोन लक्ष केवळ) (एकत्रीत सर्व भत्त्यासहीत) |
| | अतिविशेषोपचार रुग्णालय, अकोला | रु. २,३०,०००/- (दोन लक्ष तीस हजार केवळ) (एकत्रीत सर्व भत्त्यासहीत) |
| सहयोगी प्राध्यापक | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला | रु.१,८५,०००/- (एक लक्ष पंचाऐंशी हजार केवळ) (एकत्रीत सर्व भत्त्यासहीत) |
| | अतिविशेषोपचार रुग्णालय, अकोला | रु. २,१०,०००/- (दोन लक्ष दहा हजार केवळ) (एकत्रीत सर्व भत्त्यासहीत) |



५) गुणांकन पध्दत : जाहिरातीसोबत जोडलेल्या परिशिष्ट - अ मध्ये नमुद करण्यात आलेली आहे.

(१) परिशिष्ट अ मध्ये नमुद अ.क्र.१ ते ४ वरील एकुण ८५ गुणांच्या आधारे तात्पुरती गुणवत्ता यादी तयार करुन त्यानुसार उमेदवारांना प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखतीस पात्र ठरविण्यात येईल.

(२) प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखती अंती १०० गुणांपैकी किमान ४१ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविण्या-या उमेदवारांचाच करार तत्वावरील नियुक्तीकरिता विचार केला जाईल.

**नियम व अटी :**

१) करार पध्दतीने नियुक्ती कालावधी हा नियमीत उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील. तथापी सदरहु पदावर नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी उमेदवाराच्या पदस्थापनेत बदल करुन देण्याचे अधिकार आयुक्त यांना राहतील.

२) उमेदवाराचे कामकाज समाधानकारण नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्वसुचनेशिवाय संपुष्टात येईल.

३) करार पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकांनुसार अध्यापन, रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमुन दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.

४) वरीलप्रमाणे विहीत कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदा-यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.

www.A1Noukri.com
Scanned with OKEN Scanner

७) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्र/माहिती आधारसामुग्रीबाबत गोपनीय पाळणे आवश्यक राहील.

८) करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

९) उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तसा आशयाचे शपथपत्र उमेदवारास नियुक्तीपूर्वी सादर करणे बंधनकारक असेल, असे शपथपत्र सादर करण्या-या उमेदवारासच करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थीहीत विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही.

१०) बिगर सेवानिवृत्त गटातून करार पध्दतीने नियुक्त होणा-या अध्यापकांची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्यांना पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

११) अर्जदाराने संबंधित पदासाठी शारीरिकदृष्टया पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.

१२) सदर जाहिराती मधील नमुद पदसंख्येत बदल करणे/ सदरची जाहिरात पुर्णत: रद्द करण्याचा

अधिकार अधिष्ठाता स्वत:कडे राखून ठेवला आहे.

१३) नमूद रिक्त पदांच्या संख्येत बदल करणेबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांना राहतील.

१४) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रकीयेतून बाद करण्यात येईल.

१५) अर्जदाराचे नांव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे

प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१६) उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. (मुलाखतीचे वेळापत्रक वेगळयाने कळविण्यात येईल)

१७) मुलाखतीला येतांना उमेदवारांनी (Online) ऑन लाईन सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मुळ कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक राहील.

(डॉ.मिनाक्षी गजभिये)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अकोला

प्रत,
मा.आयुक्त (वैद्यकीय शिक्षण), वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई-०१
प्रतिलिपी,
१) लेखपाल,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला
२) सुचना फलक,शावैम,अकोला, ३) सुचना फलक,ग्रंथालय विभाग,शावैम,अकोला

www.A1Noukri.com
Scanned with OKEN Scanner